मेहरबान मा देहू, अध्यक्षा साहेब .नगरपंचायत कार्यालय ,देहू

**विषय क्र. १ :-** मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.

ठराव क्र. १. :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. कोणत्याही सदस्याचे रजेचे अर्ज प्राप्त नाहीत.

सूचक : सौ. पुजा अमोल दिवटे.
अनुमोदक : सौ. रसिका स्वप्निल काळोखे.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

देहू नगरपंचायत स्थापना सन २०२० ता. हवेली, जि. पुणे

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत
तहकूब सर्वसाधारण सभा दिनांक २२/०२/२०२३

Scanned with OKEN Scanner

सर्वसाधारण सभा

दि. २१/०२/२०२३ — दि. २२/०२/२०२३

वार : मंगळवार — वार :बुधवार

विषय क्र. 02 :- मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

ठराव क्र. 02 :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.

- ठराव घेताना त्याविषयीचा संपुर्ण अहवाल घेऊन लिहीत जावा.
- यापुढे प्रत्येक सदस्य जे बोलतील त्या प्रमाणे लिहीत जावे.
- यापुढे शासन नियमा प्रमाणे लिहीत जावा असे मत पुनम काळोखे यांनी मांडले.
- यापुढे प्रत्येक सदस्यांचे म्हणने लिहीत जावे असे मत योगेश परंडवाल यांनी मांडले.
- रमाई आवासचा यापुर्वी लाभ घेतला असल्यास परत घेता येणार नाही असे मत पुनम काळोखे यांनी मांडले.
- प्रभाग क्र.१ ते १७ मध्ये आवश्यकते नुसार डि. पी. घेणे बाबत.
- विषय १२ :- समिती का स्थापन करावी असे मत पुनम काळोखे यांनी मांडले
    - जिथे लिगल प्रॉब्लेम आहेत तेथे मोबदला देताना समिती स्थापन करण्यात यावी.
    - अजुनपर्यंत बांधकाम समितीची मिटींग झाली नाही ? सगळयांनी मिळुण मिटींग घ्यावी.
    - बांधकाम समितीची मिटींगच होत नाही तरी त्यांची ठराव मंजुर करतात. बांधकाम समितीची काय काय कामे झाली किती झाली.याची माहिती मिळावी समिती स्थापन केली तरी मिटींगच नाही. आम्हाला कसे कळणार काय कामे झाली आहेत.
    - जर बांधकाम समितीची मिटींगच झाली नाही तर यापुढे मी मिटींग घेईल.
    - बांधकाम सभापतीने संपुर्ण माहिती दयावी. सगळयांना विचारात घेऊन निर्णय घेऊ, सगळयांना माहिती देण्यात यावी. कामकाज पारदर्शक होईल याची दक्षता घ्यावी.

**शॉर्ट हॅन्ड टायप्रिंग वाला पाहणे जेणे करून**

- सगळया समितीची एखादी मिटींग घेण्यात यावी व त्या संदर्भात सगळयांना माहिती देण्यात यावी.
- नविन समिती स्थापन करताना सगळयांना संधी दयावी.
- सभापतींची महिन्यातुन दोन किंवा तीन मिटींग घ्यावी जेणे करुन सगळयांना कामांची माहिती होईल असे मत योगेश परंडवाल यांनी मांडले.
- सभापती / समितींची मिटींग घेण्यात यावी.
- बांधकाम समितीचा लेखी स्वरुपात आढावा दयावा.

Scanned with OKEN Scanner

- बांधकाम समितीला वैयक्तीक असा अधिकार नाही स्थायीला विषय होता व मंजुर होतात. तसेच सर्वसाधारणला पण विषय होता असे मत योगेश काळोखे यांनी मांडले.
- कोणकोणते विषय झाले त्यावर काय काम झाली याची माहिती मिळत नाही. महिला समितीची मिटींग होते यांचे संपुर्ण माहिती सांगितले जातात तसेच बांधकाम समितीची मिटींग होऊन काय कामे करावीत त्यावर काय निर्णय घ्यायचे त्यावर काय कामे व्यावीत याची माहिती होत नाही. आम्हाला काय कामे करायची आहेत याचे माहिती देता येतात. असे मत सौ.पौर्णिमा विशाल परदेशी यांनी मांडले.
- १५ दिवसात मिटींग लावण्यात येईल व त्यामध्ये काय काय कामे झाली आहेत त्याची माहिती देण्यात येईल. असे मत योगेश काळोखे यांनी मांडले.
- गावात स्वच्छता गृह नाही याची बातमी झाली
- समिती मध्ये ईच्छुक सदस्य रस्त्या संदर्भात

  भिमाशंकर रस्ता / गंधर्व रस्ता

  १. सौ. सपना जयेश मोरे.

  २. श्री.सुधिर सुरेश काळोखे.

  ३. सौ.पौर्णिमा विशाल परदेशी.

  ४. सौ. प्रियांका अभिजित मोरे.

  ५. सौ.रसिका स्वप्निल काळोखे.

  ६. सौ.ज्योती गोविंद टिळेकर.

  ७. सौ.पूनम विशाल काळोखे.

- विषय १५ :
  - प्रभाग क्रमांक ३ व ४ मध्ये जिल्हाधिकारी यांची परवानगी का घेण्यात यावी ठरावा मध्ये का घेण्यात आले. जुने कामाचे पेव्हीग ब्लॉक आहेत तेच वापरणार आहेत तेथे जिल्हाधिकारी यांची परवानागी का? असे मत मयूर दत्तात्रय शिवशरण यांनी मांडले.
  - पेव्हीन ब्लॉक बसविण्यात येतात तेथे फक्त ब्लॉक्सच बसविता येतील तेथे परवानगीची गरज नाही? मुख्याधिकारी
  - ठरावामध्ये मान्यता होती परंतु यामध्ये जिल्हाधिकारी याचा उल्लेख आला आहे. परंतु या कामाला मान्यता आहे. परंतु यापुढे नविन काम करताना परवानगी घेण्यात यावी. नगराध्यक्षा
  - ठेकेदाराने रस्ता करताना पेव्हींग ब्लॉकसाठी जागा सोडली आहेत खड्डापण सोडल्या पण त्यामध्ये ब्लॉक का बसविले नाही याची माहिती घ्यावी.
  - रस्त्यांची पहाणी करावी यापुर्वीच्या रस्त्यांना का ब्लॉक बसविले नाही याची पाहणी करावी व त्याची चौकशी करावी महिन्या भरात कामे करून घ्यावी ठेकेदाराला ब्लॅक लिस्टमध्ये टाका असे मत योगोश परंडवाल यांनी मांडले.
  - रस्ते करताना ठिक ठिकाणी ब्लॉक व साईड पट्टया केल्या नाहीत.
- विषय १६ :
  - नविन लाईन करताना परवानगीची आवश्यकता आहे पण जुने करताना आपण करणारच आहोत. जुनी लाईट दुरुस्ती करु शकतो असे मत नगराध्यक्षा यांनी मांडले.

Scanned with OKEN Scanner

- विकास निधीतुन करण्यात यावा त्यास मंजुरी आहे असे मत नगराध्यक्षा यांनी मांडले.
- १०० % लाईट गायरानातुन नाही काही लाईट हि खाजगी जागेतुन आहे असे मत योगेश काळोखे यांनी मांडले.
- सरकारी गायरानातुन असेल तर परवाणगी प्रायव्हेट जागेतुन करता येईल.
- लाईट दुरुस्त करण्यात यावी तसा ठराव आहे. स्थानिक विकास निधीतुन करण्यात यावी यास हारक नाही.
- यापुढे व्हि.डि.ओ शुटींगसाठी मागणी केली कि जेणे करून जे लिहीले बोलले याचा उल्लेख येत नाही. यासाठी शुटींग हवी जेणे करून लिहीलेले कळेल असे मत प्रविण काळोखे यांनी मांडले.
- ठाकर वस्ती आहे तेथे ७/१२ आहे तेथे परवानगीची काय गरज असे मत मयुर शिवशरण यांनी मांडले.
- जे ठरावात आहे तेच प्रोसिडींग मध्ये लिहिण्यात यावा जर प्रोसिडींग मध्ये एक व प्रोसिडींग वही कच्ची वही मध्ये एक असे नको असे मत योगेश काळोखे यांनी मांडले.
- सदर ठिकाणी जागा दिली पण त्यांची पण ठाकर समाजाचीपण परवानगी घेणे गरजेचे आहे. भविष्यात जागा नको म्हणून त्याठिकाणी काहीही करताना नियमानुसार करावे असे मत योगेश परंडवाल यांनी मांडले.
- या पुर्वी कामे केलेली आहेत याची पहाणी करणे

➢ विषय १९ : सदरचे काम नगरपंचायत फंडातुन काम करण्यात यावे

➢ विषय २० : स्थानिक विकास निधीतुन जी जी कामांसंदर्भात यादी घेतली होती त्याची माहिती देण्यात यावी. असे मत सुधिर काळोखे यांनी मांडले.

- नगरपंचायत मार्फत जी जी कामे घेण्यात आलेली होती त्याचे काय झाले बेंच, बसस्टॉप, नावाची पाटी, व इतर अत्यावश्यक कामे यांचे काय झाले ते सांगण्यात यावे असे मत योगेश परंडवाल यांनी मांडले.
- नगरपंचायत बेच, पाटया यांना मंजुर करुन झाले आहे पण स्थानिक कार्यकत्यानीं त्यास कलेक्टरकडे विरोध करण्यात आला आहे.
- कलेक्टर साहेबांनकडे तक्रार आलेली आहे त्यापुढे योग्य ती परवानगी घेऊनच कामे करण्यात येणार आहे असे मत मुख्याधिकारी यांनी मांडले.
- सोसायटींनी जर शुल्क भरलेला आहे तर त्यांना बेच देण्यास काहीही हरकत आहे का ? का त्यांना त्याचा लाभ देण्यात काही अडचण आहे का? असे मत प्रविण काळोखे यांनी मांडले.
- जर काही अडचण येणार असेल तर त्याचे स्पस्टीकरण दयावे असे मत प्रविण काळोखे यांनी मांडले.
- पत्र कोणाचे आहे त्याचे पत्राची वाचण करण्यात यावे, पत्र सतत येत राहणार आहे, आम्ही कोठे पोल, कोठे बेंच बसविले याची माहिती दिलेली आहे. जर पत्र येणार म्हणुन काम करणार नाही का? असे मत पुनम काळोखे यांनी मांडले.
- १५ दिवसात निर्णय घेऊन बेंच व बसस्टॉप बसविण्यात येतील असे मत मुख्याधिकारी यांनी मांडले.
- नगरपंचायतीमध्ये मंचाची जी पत्रे येतात तेव्हा त्यांना विचारा का? त्यांचा नक्की काय उद्देश आहे. याचा खुलासा करण्यात यावा.
- एक सर्वांच्या वतीने पत्र देण्यात यावा मंचाला व त्यांचा स्पष्ट स्पस्टीकरण मागवुन घेण्यात यावे असे मत पुनम काळोखे यांनी मांडले.

Scanned with OKEN Scanner

- मंचाला नगरपंचायतीच्या वतीने मुख्याधिकारी साहेबांनी पत्र दयावे असे मत नगराध्यक्षा यांनी मांडले.
- पाण्याची टाकी साफ का करत नाही ? पाण्याची टाकी साफ करणे खुपच गरजेचे आहे. पाण्याला खुपच घाण वास येत आहे. पाणी खुपच खराब येत आहे. असे मत पौर्णिमा परदेशी यांनी मांडले.
- पंधरा दिवस पाणी येत नाही , पाणी आल्यावर जर ते खुप खराब असेल तर ते पाणी का प्यावे, नागरिकांनी का बिल भरावीत असे मत पौर्णिमा परदेशी यांनी मांडले.
- पाणी नमुने पंधरा दिवसात पाणी तपासणी केली जाते. व त्याचे रिपोर्ट १५ दिवसात येतात. असे मत अक्षय रोकडे यांनी मांडले.
- घरातील पाण्याचा नमुना घेतात, त्यांनी नळाच्या पाण्याचा नमुना घ्यावा.
- नमुने घेताना घरगुती नळाचा नमुना घ्यावा त्यासाठी आपला एक नगरपंचायतीचा कर्मचारी देण्यात यावा असे मत मुख्याधिकारी यांनी मांडले.
- ग्रामपंचायत असताना जेवढे पाण्याचे हाल झाले नाही तेवढे नगरपंचायत आल्यानंतर सुरु झाले आहे असे मत पुनम काळोखे यांनी मांडले आहे.
- पाण्यामुळे गावात खुप नागरिक आजारी आहेत. त्यावर लवकरात लवकर कार्यवाही करावी व शुध्द पाणी देण्यात यावे असे मत पौर्णिमा परदेशी व पुनम काळोखे यांनी मांडले.
- उन्हाळया दिवसाला सुरुवात झाली आहे तेव्हा पाण्याची टाकी धुवुन घेण्यात यावी असे मत पौर्णिमा परदेशी यांनी मांडले.
- बोडकेवाडी येथे लाईट गेल्यावर जनरेटर सुरु आहे का ? ते सुरु का करत नाही ? MECB ला पत्र देणे , तिथे डि.पी दिली आहे त्यावरुनच इतरांना कलेक्शन दिले आहेत. त्यामुळे होल्टेज कमी जास्त होत त्यामुळे ते कनेक्शन काढुन घेणेबाबत पत्र देणे , नविन मोटारला काय झाले?
- B.D.O ना पत्र देणे उदघोषणे नंतर जे कर्मचारी कामाला लागले आहेत त्यांच्या बाबत सहपत्रची मागणी देण्यात यावी.
- B.D.O चे पत्र आले आहे व जिल्हा परिषदेचे जे पत्र आले आहे त्या वर अहवाल तयार करुन पाठविण्यात यावा व जेणे करून त्यांच्या कडुन सहपत्र १ प्राप्त होईल.
- कामासाठी कोणाचे अर्ज आहेत असे मत पुनम काळोखे यांनी मांडले.

➢ विषय २६: रस्ता करताना रस्ताचे पैसे ठेकेदारांना टप्या टप्याने पैसे देण्यात यावे असा ठराव झाला होता.

- रस्ता होताना स्थानिक नगरसेवकांना बोलविले नाही. असे मत मिना कुऱ्हाडे यांनी मांडले.
- रस्त्याचे काम करताना बोलविले नाही तसेच अंडरग्राऊंड लाईटचे काम करताना आम्हाला सांगण्यात आले नाही किंवा जिथे सांगितले तेथे काम झाले नाही. जिथे नको तिथे झालेले आहेत.
- जिथे कामे सांगितली जिथे झाली नाही असे झाले का ते पहाणे असे मत प्रविण काळोखे यांनी मांडले.

Scanned with OKEN Scanner

- विषयांना सुचक अनुमोदक देताना सदस्यांना विचारूनच नावे देण्यात यावीत असे मत पुजा काळोखे यांनी मांडले.
- ज्या सदस्याने विषय मांडला त्यांना सुचक अनुमोदक देण्यात यावे असे मत पुजा काळोखे यांनी मांडले.

➢ **विषय ३८:** विकास शुल्क निधीतुन काम का घेण्यात आले त्यास मा.सो हस्तशेप आहे , माझा विषय पुढच्या मिटींग मध्ये घेण्यात यायला हवा होता. असे मत पुनम काळोखे यांनी मांडले.

- माझे काम करताना स्थानिक निधीतुन का घेतले नाही. असे मत पुनम काळोखे यांनी मांडले.
- यापुढे ठरावामध्ये ज्या निधीतुन कामे करायची आहेत त्यांचा उल्लेख करण्यात यावा असे मत पुनम काळोखे यांनी मांडले.
- अजेंठयावर जे विषय आहेत त्यातील किती कामे झालीत ते सांगणे असे मत पुनम काळोखे यांनी मांडले.
- माझे रस्ते जे झाले आहेत ते सगळे वर्ग आहेत असे मत पुनम काळोखे यांनी मांडले.

➢ **विषय ३८ :** सदरच्या रस्त्या संदर्भात जर तो रस्ताचा स्थानिक निधीमधुन मंजुर झाला असेल तर त्याला विकास शुल्क मधुन का घेण्यात आला ? ,

- सदरचा रस्त्यासंदर्भात जी तरतुद असेल त्यामधुन निधी असेल यापुढे काम करण्यात यावे.
- विदयुत केबल अंडरग्राऊंड कामे अर्धवट झाली आहेत, जर कामे सहा सहा महिने सुरु आहेत, काही ठिकाणी कामे झाली काही ठिकाणी नाहीत. त्यांना ब्लॅक लिस्टला टाका , टेंडर भरलेली व्यक्ती काम करण्यात येत नाही त्यांना काम का करत नाही यासाठी परत पत्र दयावा. काम करणार आहे की नाही याची विचारणा करणे असे मत पौर्णिमा परदेशी यांनी मांडले.
- कर्मचारी यांचा पण विमा काढताना संपुर्ण फॉमिलीचा काढता येतो का ते पहाणे. तसेच नवरा / बायको दोघेही. सरकारी कर्मचारी असतील तर त्यांचा घेऊ नये. चौकशी करून विमा काढावा जर फॅमिलीचा संपुर्ण काढावा.
- सदरचा विषय कोणी मांडला तेथील लोकांची अशी कोणाचीच मागणी नाही. मी चौकशी केली तर तेथे लाईट पाण्याची आवश्यकता आहे. तेथील जी मागणी आहे तें घ्यायचे तर जी मागणी नाही तो विषय घेताय. मी लाईटची मागणी केली आहे तो करण्यात यावा. असे मत मिना कुऱ्हाडे यांनी मांडले.
- सदरचा विषय चर्चा झाली स्थानिक लोकांचे पत्र आले त्यासाठी NOC मिळावी या साठी पत्र प्राप्त झाले. सदर हा रस्ता R.P प्रमाणे १९९७ साली मंजुर झाला. तेथील जागा JV ला दिल्यानंतर तेथुन रस्ता जात आहे. तेथील खर्च नगरपंचायत ने करायचा नाही तेथील स्थानिक नगरसेवकांना NOC घेताना विचारण्यात यावे.
- R.P रोड आहे निधी नगरपंचायत खर्च करणार नाही IT पार्क MIDC च्या गाडया परंडवाल चौकात येतात त्यामुळे ट्रॅफिक होते या ब्रिजमुळे ट्रॅफिक कमी होईल

Scanned with OKEN Scanner

त्यामुळे स्थानिकांना पण दळण वळण करण्यासाठी सोयीचे होईल. वाहतुक वाढली तर स्थानिकांना उत्तम तयार होईल. NOC दयायला नगरपंचायतीला दयायला हरकत नाही. सदर विषय नियमाला धरुन करण्यात यावे असे मत प्रविण काळोखे यांनी मांडले.

- जो विषय माझ्या वॉर्डतील आहे त्यामुळे मला विचारात घ्यावे. असे मत मिना कुऱ्हाडे यांनी मांडले.

मी शेतकरी आहे मला तेथील कामाची आवश्यकता आहे योगेश काळोखे यांनी मांडले.

सगळयांचे मागणीपत्र देणेत याव्यात सगळे पेपर देण्यात यावेत. रस्ता कोठे जाताय ते माहित नाही, तेथील स्थानिक नगरसेवकांना विचारणे पण गरजेचे आहे सगळयांची पत्रे देण्यात यावीत. असे मत नगराध्यक्षा यांनी मांडले. R.P रोड आहे, शेतकऱ्यांचा विषय आहे. जी शेतकरी NOC घेतील त्यावेळेसं ते संपर्ण फाईल देतील शेतकऱ्यांना ती गोष्ट आवश्यक आहे म्हणून पुलाची मागणी केली. निधी शेतकरी उपलब्ध करणार आहे. R.P रोडची संपुर्ण माहिती N.O.C घेताना देतील. सदरचा रस्ता किती व काय आहे जो पुल होताना.

चांगल्या प्रोजेक्टला बगल न देता गावाचा विकास होत असतात गावाचा विचार करावा गावाच्या विकासात कोणीही अडवु नये कोणी विरोध करुन नका. गावाच्या विकासात आडचण आणु नये त्यात आडचणी आणणार आसेल तर आम्ही नक्कीच विचार कारू सगळयांचे विचार मांडण्यात यावे. असे मत योगेश परंडवाल यांनी मांडले.

- नगरपंचातीस काय फायदा आहे स्थानिक लोकांना काय फायदा होणार आहे त्यामुळे टॉफीक माझ्या जागेत होणार आहे असे मत सुधिर काळोखे यांनी मांडले.
- सदरचा ठराव मंजुर असताना तो नामंजुर करता येतो का ? असे मत योगेश काळोखे यांनी मांडले.
- सदरचा ठराव नांमंजुर करण्यात यावा किंवा बहुमत घेऊन विषय घेण्यात यावा मतदान घेण्यात यावे, ठराव नामंजुर करण्यात यावा असे मत मिना कुऱ्हाडे यांनी मांडले.
- मी मिटींगला नव्हते त्यामुळे त्यास माझी हरकत आहे तो नामंजुर करावा असे मत मिना कुऱ्हाडे यांनी मांडले.
- सदरचा पुल झाल्यावर तेथील स्ट्रिट लाईट बील तेथील मेंन्टेनन्स, कोणतीही हानी झाल्यास नगरपंचायत जबाबदार नाही, टॉफीक होणार नाही याची संपुर्ण जबाबदारी पुल बनवणाऱ्यांनी घ्यावी. त्या पुला संदर्भात कोणताच खर्च नगरपंचायत करणार नाही. असे मत पौर्णिमा परदेशी यांनी मांडले.
- सदरच्या पुलासंदर्भात लॉग टाईम जबाबदारी हि त्या पुल धारकांवर देण्यात यावी, सदर पुला संदर्भात मागणीपत्र लगेच घेऊन कार्यवाही केली. असे मत पौर्णिमा परदेशी यांनी मांडले.
- मागणी पत्रात्रा विषय मिटींग सुरु असताना घेण्यात आला.
- मागणीपत्राचा विषय झाला त्यामुळे तीं पाहिल्या पासुन कागदपत्रांची संपुर्ण पुर्तता झाल्यानंतर त्याच्या संदर्भात निर्णय घेण्यात येईल असे मत नगराध्यक्षां यांनी मांडले.
- अर्जदाराला पत्र देणे अर्ज दारांनी संपुर्ण कागदपत्र सभागृहात सादर केल्यानंतर परवानगी देण्यात येईल NOC देण्यात यावी असे मत मुख्याधिकारी यांनी मांडले.
- बाजार आळीतील टाकी, अंडरग्राऊंड केबल, झाडाचा ओटा यांचे T.C. झाले पण अजुन पर्यंत काम नाही.असे मत सपना मोरे यांनी मांडले.

Scanned with OKEN Scanner

- T.C. झाले असल्यास टेंडर करणे असे मत मुख्याधिकारी यांनी मांडले.
- ज्या ज्या पंडातुन पैसे जास्त असतील त्यातुन काम करण्यात यावे बाजार आळी, नगरपंचयत, स्थानिक ,विकास शुल्क यापैकी ज्यानिधीत पैसे असतील त्यातुन काम करण्यात यावे. असे मत सपना मोरे यांनी मांडले.

सुचक :- श्री.सुधिर सुरेश काळोखे.
अनुमोदक :- सौ.सपना जयेश मोरे.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक

देहू नगरपंचायत ★ स्थापना सन २०२० ★ ता. हवेली, जि. पुणे

Scanned with OKEN Scanner